मुंबई विद्यापीठ

मुंबई ४०० ०३२
जा.क्र.मावक/३९/४१५/१९९५

परिपत्रक
-------

विषय:-विद्यापीठ आणि संलग्नित अशासकीय महाविद्यालयामध्ये संवर्गेवार व विषयावर आरक्षण ठेवण्याबाबत.

ज्याअर्थी शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक: एनजीसी-१४९४/[२९९१]/विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५ अन्वये शासकीय महाविद्यालयाप्रमाणे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षण शास्त्र इत्यादि महाविद्यालयात संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेवण्यात यावे व त्या अनुषंगाने २०० बिंदू नामावली तयार करून त्यानुसार मागासवर्गीयांकरिता पदे आरक्षित ठेऊन ती भरावीत असे आदेश दिले आहेत.

आणि

त्याअर्थी, मी, डॉ.[श्रीमती] स्नेहलता मा. देशमुख, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४[८] अन्वये मला दिलेल्या अधिकारात असे निदेश देत आहे की,

१. शासन निर्णय : उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक:एनजीसी-१४९४/[२९९१]/विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५ मधील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षण शास्त्र इत्यादि महाविद्यालयात संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेवण्यात यावे व त्या अनुषंगाने २०० बिंदू नामावली तयार करून त्यानुसार मागासवर्गीयांकरिता पदे आरक्षित ठेऊन भरण्याबाबतचे आदेश मुंबई विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात येत आहेत.

२. विद्यापीठ, संलग्नित अशासकीय महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था, शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी-१४९४/[२९९१]/विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५ मधील आदेशानुसार संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेऊन व त्या अनुषंगाने २०० बिंदू नामावलीनुसार मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरतील.

३. शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१४९४/[२९९१]/विशि-४, दिनांक २४ एप्रिल, १९९५ ची प्रत सोबत जोडली आहे.

४. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था मुंबई विद्यापीठाच्या या निदेशाची अंमलबजावणी करतील.

५. हे निदेश तात्काळ लागू होतील व या संबंधीचे परिनियम तयार करून त्यांची कुलपतींकडून अनुमती घेऊन निर्गमित करीपर्यंत अंमलात राहतील.

मुंबई ४०० ०३२.
दिनांक २१ ऑक्टोबर, १९९५

सही/-
[डॉ.[श्रीमती स्नेहलता देशमुख ]
कुलगुरु

....२/-

प्रति,

१. संचालक, रसायनतंत्र विभाग, मुंबई विद्यापीठ [स्वायत्त]
२. संचालक/प्राचार्य, सर्व अशासकीय महाविद्यालये व मान्यताप्राप्त पदव्युत्तर शिक्षण संस्था.
३. सचिव अध्यक्ष, सर्व शैक्षणिक संस्था व मंडळे.

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

अ]१. संचालक/प्रमुख, विद्यापीठ विभाग, प्राचार्य सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय,प्राचार्य,घटक महाविद्यालये आणि प्रमुख,घटक मान्यताप्राप्त संस्था.
२. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ.
३. संचालक, पश्चिम क्षेत्रीय उपकरण विज्ञान केंद्र.
४. संचालक, दूर शिक्षण संस्था , मुंबई.
५. अधिष्ठाता सर्व विद्या शाखा.
६. संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था.
७. ग्रंथपाल, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय.
८. पीठासीन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व श्रीमती ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ, महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण.
९. मानद विधी सल्लागार, मुंबई विद्यापीठ.

ब]१. सचिव, विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली.
२. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई.

अकृषि विद्यापीठे तसेच संलग्नित अशासकीय महाविद्यालयांमध्ये संवर्गवार व विषयवार आरक्षण ठेवण्याबाबत......

---

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: एनजीसी-१४९४/[२९९१]विशि-७
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक २४ एप्रिल, १९९५.

वाचावे : शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी १०९३/आरक्षण/१६८१०/७ अ, दिनांक २.७.१९९४.

प्रस्तावना : मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाकडे शासकीय महाविद्यालयांत काम करणा-या महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-१ मधील अधिव्याख्यात्यांना महाविद्यालयातून नियुक्त केल्या जाणा-या अधिव्याख्यात्यांसाठी विषय निहाय आरक्षण ठेवण्याबाबत याचिका १००४/८९ दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणी उच्च न्यायालयाने दि. २४.९.९० रोजी विषय निहाय आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश दिले असून प्रस्तुत प्रकरणांत राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयांत दाखल केलेल्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय कायम केला आहे.

शासन निर्णय : अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र इ. महाविद्यालयांना वरील आदेश लागू करण्याची बाब काही काळ शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आता असे आदेश देत आहे की, शासकीय महाविद्यालयां प्रमाणे अकृषि विद्यापीठे व संलग्नित असणा-या अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, व शिक्षण शास्त्र इ. महाविद्यालयांत देखील संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेवण्यांत यावे व त्या अनुषंगाने २०० बिंदू नामावली तयार करून त्यानुसार मागासवर्गीयांकरिता पदे आरक्षित ठेऊन ती भरावीत. भरती वर्षात मागासवर्गीयांसाठी असणा-या राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्याच्यावर जाणार नाही याची खातरजमा नियुक्ती अधिका-यांनी करून घ्यावी.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या [मागासवर्गीय कक्ष] सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
[अ. मा. भट्टलवार]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

......२/-

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर.
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती.
कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, लोणारे,
जिल्हा रायगड.
शिक्षण संचालक [उ.शि.] महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त/सामान्य प्रशासन विभाग [१६ ब] मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक [उच्च शिक्षण] मुंबई/पुणे/जळगांव/कोल्हापूर/अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नांदेड.
कार्यासन विशि - १,२,३, मशि - १,२,३,४,५ तांशि - १,२,३,४,व ५
निवड नस्ती - विशी - ४.